1 नियमित फौ. ख. क्रं. ३६ / २०१९
सरकार -वि.- सुरेश व ईतर एक
नि.क्रं. ३५.

सरकार तर्फे साक्षीदार क्रं.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव - राजेंद्र गुलाबराव शिंदे,
वय ४७ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणाार – उमरेड, ता. उमरेड, जि. नागपूर.

<u>**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री व्ही.डब्ल्यु.वानखडे यांचे मार्फत**</u>

१. मी आरोपींना ओळखतो. घटनेला अंदाजे चार वर्ष झाले असेल. घटना दुपारी ३.०० ते ३.३० वाजताचे दरम्यान घडली होती. घटना ही आरोपी व माझे शेताच्या मधल्या रस्त्यावर घडली. त्यादिवशी मी उमरेडला होता, तेव्हा सुरेश शिंदे याने मला माझे शेतातील मजुर विजेश्वर वांढरे याच्या फोनवरुन फोन केला व मला शेतात बोलाविले. मी तेव्हा शेतात पोहोचलो तेव्हा मी विचारले की, मला कशाला बोलाविले. त्याने माझेसोबत पाईप लाईनच्या कारणावरुन भांडण सुरु केले. तेव्हा सुरेश शिंदे याने माझे बैलबंडीची लाकडी उभारी काढून आणली व मला मारली. ती माझे डाव्या बाजूच्या कमरेला मारले होते. तेव्हा माझी पत्नी मधात आली. तेव्हा तिच्याही हाताला ती लाकडी उभारी लागली. त्यानंतर मी पुढील स्टेशनला जावून फिर्याद दिली. त्यानंतर मी माझे पत्नीला उपचाराकरीता सरकारी दवाखान्यात नेले होते. ज्या लाकडी उभारीने मला व माझे पत्नीला दाखविल्यास ती मी ओळखू शकतो.

(मुद्देमालाबाबत प्रश्न उद्दभवल्यामुळे सरतपास तहकुब.)

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक ११.०९.२०२३.

( एस.जे. लाड )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.